सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# डॉ. पी. सी. अलेक्झांडर

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

१५ मार्च १९९३

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्य,

राज्य विधानमंडळाच्या १९९३ मधील या पहिल्या अधिवेशनात आपले स्वागत करताना मला आनंद होत आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आज प्रथमच मला आपल्यासमोर बोलण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्राच्या जनतेला माझ्या हार्दिक शुभेच्छा देत असताना आपल्या सर्वांच्या सहकार्याने जनतेची सेवा करण्याचा माझा सतत प्रयत्न राहील, अशी मी आपल्याला खात्री देऊ इच्छितो.

२. योजना आयोगाशी विचारविनिमय करून १९९३–९४ च्या वार्षिक योजनेचे आकारमान ३,८०४ कोटी रुपये इतके निश्चित करण्यात आले असून १९९२–९३ पेक्षा ते २० टक्क्यांनी अधिक आहे. या योजनेत ऊर्जा विकास, पाटबंधारे व पाणलोट व्यवस्था, कृषी, ग्रामविकास आणि किमान गरजांसाठी तरतूद या गोष्टींवर भर देण्यात आला आहे.

३. २० कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासंबंधात १९८५–८६ ते १९९०–९१ पर्यंतच्या ६ वर्षांपैकी ४ वर्षांमध्ये देशात आपले राज्य प्रथम क्रमांकावर राहिले असून गरीब जनतेच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्यासंबंधीची माझ्या शासनाची बांधीलकी त्यावरून स्पष्ट होते. १९९१–९२ या वर्षात राज्याने या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत दुसरे स्थान मिळविले आहे.

४. अयोध्येतील दुर्दैवी घटनेपाठोपाठ डिसेंबर १९९२ मध्ये राज्यात मुंबई व इतर काही ठिकाणी जातीय दंगली झाल्या. जानेवारी १९९३ मध्ये मुंबईत परत दंगल झाली. या दंगलींमुळे जीवित आणि मालमत्ता यांची मोठ्या प्रमाणावर हानी तर झालीच पण त्याशिवाय अनेक वर्षे या राज्याने प्रयत्नपूर्वक जोपासलेल्या जातीय सलोख्याच्या प्रतिमेलाही तडे गेले. मुंबईमध्ये झालेल्या दंगलींची व्यापक अशी न्यायालयीन चौकशी करण्याचे तसेच राज्याच्या इतर दंगलग्रस्त भागांसंबंधात दंडाधिकारी चौकशी करण्याचे आदेशही शासनाने दिले आहेत. दरम्यान समाजाच्या सर्व थरांतील लोक, केंद्र शासन, महानगरपालिका व स्वयंसेवी संस्था या सर्वांच्या सहकार्याने दंगलग्रस्तांना सहाय्य देण्याचे तसेच त्यांचे पुनर्वसन करण्याचे मुख्य काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे.

दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मृतांच्या कुटुंबियांस आर्थिक मदत; निराधार झालेल्या व्यक्तींना अनुग्रह सहाय्य; हानी पोहोचलेल्या झोपड्यांची आणि पक्क्या बांधकामांची फेरबांधणी व दुरुस्ती यांसाठी वित्तीय सहाय्य; दुकाने, गाळे व इतर व्यापारी आस्थापना यांचे नुकसान झाले असल्यास त्यांच्या फेरबांधणीसाठी अथवा दुरुस्तीसाठी कर्जे व आर्थिक सहाय्य इत्यादींसाठी शासनाने आतापर्यंत एकूण १४.४० कोटी रुपयांचे सहाय्य दिले आहे. याशिवाय नेहरू रोजगार योजना, महात्मा फुले महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ इत्यादींच्या सहाय्याने दंगलग्रस्तांना त्यांची घरे पुन्हा बांधण्यास व उद्योग पुन्हा सुरू करण्यास आणखी कर्जे देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. राज्य शासन सार्वजनिक क्षेत्रांतर्गत बँका व वित्तीय संस्थांशी सतत संपर्क ठेवून आहे. स्वयंसेवी संस्थांनी या प्रसंगी तात्काळ धाव घेऊन दंगलग्रस्तांना विविध स्वरूपाचे सहाय्य देण्याच्या बाबतीत जी आदर्श कामगिरी बजावली तिचा येथे उल्लेख करण्यास मला आनंद वाटतो. हे सर्व प्रयत्न पूर्ण जोमाने असेच पुढे चालू ठेवणे अत्यावश्यक आहे.

दळणवळण साधनसामग्री, वाहने, शस्त्रास्त्रे, अतिरिक्त पोलीस ठाणी व चौक्या याबाबतीत पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी राज्य शासनाने अनेक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. डिसेंबर १९९२ आणि जानेवारी १९९३ मध्ये राज्यात घडलेल्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी माझे शासन सर्व उपाययोजना करीत आहे.

असे असले तरी सर्व राजकीय पक्ष आणि सामाजिक व स्वयंसेवी संस्था यांनीही एकत्र येऊन धर्मांध शक्तींविरुद्ध उभे राहिले पाहिजे आणि राज्यात कायमस्वरूपी जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

५. मुंबईची परिस्थिती सुरळीतपणे पूर्वपदावर येत होती. तथापि, १२ मार्च रोजी, अनेक व्यापारी केंद्रांसह वेगवेगळ्या ठिकाणी अर्थव्यवस्थेला दुर्बल करण्याच्या हेतूने करण्यात आलेल्या बॉम्ब स्फोटांमुळे मुंबईला जबरदस्त हादरा बसला आहे. या घटनांमध्ये जवळपास २२५ पेक्षा अधिक लोक मरण पावले असून १,२०० पेक्षा अधिक लोक जखमी झालेले आहेत. शासकीय व महानगरपालिका रुग्णालयातील कर्मचारीवर्ग या संबंधात प्रचंड काम करीत असून अविरत सेवा पुरवीत आहे. या घटनांची झळ पोचलेल्या सर्व लोकांना तातडीचे सहाय्य देण्याचे काम युद्ध पातळीवर करण्यात येत असून मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना आणि जखमी लोकांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. हे क्रूर व निर्घृण कृत्य करणाऱ्या अपराध्यांना पकडण्यास माझे शासन बांधील आहे. शहरामध्ये शांतता प्रस्थापित करण्याकरता सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

६. या जातीय दंगलींमध्ये जखमी झालेल्या व्यक्तींवर वैद्यकीय उपचार करणे व त्यांना इतर तातडीच्या सेवा उपलब्ध करून देणे याबाबत शासनाचे आणि मुंबई महानगरपालिकेचे डॉक्टर, परिचारिका, निमवैद्यकीय कर्मचारी, अग्निशमन सेवा कर्मचारी आणि अन्य अधिकारी व कर्मचारी यांनी जी अतुलनीय सेवाबुद्धी व तत्परता दाखवली त्याबद्दल माझे शासन त्या सर्वांची मनःपूर्वक प्रशंसा करीत आहे.

७. १९९१–९२ च्या खरीप हंगामातील अन्नधान्य उत्पादनाने १.१२ कोटी मेट्रिक टन इतका उच्चांक गाठला असून १९८९ मधील ८४ लाख मेट्रिक टनांचा आतापर्यंतचा उच्चांक ओलांडला आहे. शासकीय अधिकाऱ्यांना कृषि व्यवस्थापनाचे सर्वंकष प्रशिक्षण देण्याकरिता नागपूर येथे १ जुलै १९९२ पासून वसंतराव नाईक कृषि व्यवस्थापन संस्था सुरू करण्यात आली आहे. रासायनिक खतांच्या किंमतींवरील नियंत्रण काढून टाकल्यामुळे या खतांच्या किंमतींत जी वाढ झाली ती सोसण्यास शेतकऱ्यांना अंशतः अर्थसहाय्य देण्याच्या केंद्र शासनाच्या योजनेचा राज्य शासनाने लाभ घेतला असून या किंमती कमी करून त्या स्वरूपात १६.८२ कोटी रुपये शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले आहेत. याखेरीज केंद्र शासनाकडून मिळालेल्या ३५.८३ कोटी रुपयांच्या अनुदानातून अल्प व अत्यल्प जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना विहिरीवर बसविण्यासाठी विजेचे पंप उपलब्ध करून देण्याची योजनाही माझ्या शासनाने मंजूर केली असून २०,००० शेतकऱ्यांना तिचा लाभ होईल. या योजनेमुळे २५,००० हेक्टर जमीन जलसिंचनाखाली येईल अशी अपेक्षा आहे.

८. राज्यातील कृषि विद्यापीठांनी कापसाच्या सीएएचएच ४६८ आणि एनएचएच ३०२ या दोन नवीन संकरित जाती आणि बाजरीची ‘ श्रद्धा ’ या नावाची नवीन संकरित जात विकसित केली आहे. या जाती शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरल्या आहेत आणि या जातींच्या बियाणांचे उत्पादन करण्याचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

९. ‘ दुधाचा महापूर-तीन ’ कार्यक्रमांतर्गत राज्याच्या सर्व जिल्ह्यांकरिता २५५ कोटी रुपयांचा प्रकल्प तयार करण्यात आला आहे. या रकमेपैकी राज्य शासनाकडून अर्थसहाय्य म्हणून १०५ कोटी रुपये देण्यात येतील तर राष्ट्रीय दुग्धव्यवसाय विकास मंडळाकडून कर्ज म्हणून १५० कोटी रुपये मिळतील. या कार्यक्रमामुळे महाराष्ट्राच्या दरदिवशीच्या सरासरी दूध उत्पादनात लक्षणीय वाढ होईल.

१०. पाणलोट क्षेत्र विकास आणि भूजलाचे पुनर्भरण हा एकात्मीकृत कार्यक्रम परिणामकारकपणे राबवण्यासाठी राज्य शासनाने ‘ जलसंधारण ’ हा नवीन विभाग निर्माण केला आहे. १४ नोव्हेंबर १९९२ पासून सुरू झालेल्या या कार्यक्रमाच्या पहिल्या

टप्प्यासाठी ५,९८१ गावांची निवड करण्यात आली आहे. रोजगार हमी योजना आणि जवाहर रोजगार योजना यांच्याकडून मिळणाऱ्या निधीव्यतिरिक्त या कार्यक्रमाच्या योजनांतर्गत तरतुदीत यावर्षी २६.६० कोटी रुपयांवरून ८५.२२ कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली. रोजगार हमी योजनेमार्फत खाजगी पडीत जमिनींवर झाडे लावण्याची नवीन योजना सुरू करण्यात आली असून या योजनेखाली १९९३–९४ मध्ये २०,००० हेक्टर पडीत जमिनीवर झाडे लावण्यात येतील.

११. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, पाणी वळवण्यासाठी बंधारे, साठवण बंधारे, गाव तलाव व पाझर तलाव यांसारख्या लहान पाटबंधाऱ्यांच्या कामांवरही अधिक भर देण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे. मोठ्या संख्येने अशी नवीन कामे सुरू करण्यासाठी स्थानिक क्षेत्रांतर्गत योजनांवरील खर्च यावर्षी ३९.२९ कोटी रुपयांवरून ७७.७४ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आला. १९९३–९४ मध्ये या कार्यक्रमाला आणखी चालना देण्यात येणार आहे.

१२. नोव्हेंबर–डिसेंबर १९९२ मध्ये राज्यात ७,७७९ ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्यात आल्या आणि उरलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकाही घेण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधांचे परिणामकारक व्यवस्थापन करण्यासाठी माझे शासन प्रयत्न करीत आहे. एकात्मीकृत बाल विकास योजनेखाली यावर्षी १,७२७ नवीन अंगणवाड्या सुरू करण्यात आल्या असून त्यांचा लाभ आणखी १,७२,७०० मुलांना मिळत आहे. अशा प्रकारे अंगणवाड्यांची एकूण संख्या आता २५,७२७ झाली असून त्यामुळे २५.७२ लाख मुलांची आरोग्यविषयक आणि पोषण आहारविषयक काळजी घेतली जात आहे.

१३. ७,२९७ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने शासनाने या गावांत विंधण विहिरी खोदणे, तात्पुरत्या पाणीपुरवठा योजना आखणे, नळाद्वारे पाणीपुरवठ्याच्या योजनांची विशेष दुरुस्ती करणे आणि टँकर व बैलगाड्या यांमधून पाणीपुरवठा करणे यांसारख्या उपाययोजना हाती घेतल्या. शासनाने या उपाययोजनांवर ४९.११ कोटी रुपये खर्च केले आहेत. यापुढेही राज्यातील इतर गावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास ती निवारण्यासाठी माझे शासन प्राथम्यक्रमाने उपाययोजना करील.

१४. १९९१-९२ मधील तीव्र अवर्षणामुळे रोजगार हमी योजनेवर प्रचंड ताण पडला आणि रोजगार हमी योजनेखालील कामगारांची १९९१ च्या सुरुवातीला प्रतिदिन २.८१ लाख असलेली उपस्थिती १९९२ च्या सुरुवातीला प्रतिदिन ९.८६ लाख एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढली. रोजगार हमी योजनेखाली यावर्षी सुमारे ४२६ कोटी रुपये खर्च करावे

लागतील आणि एकूण १४.२० कोटी श्रमदिवस निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन विकास कार्यक्रमाचाही या वर्षामध्ये झपाट्याने विस्तार झाला आहे आणि यावर्षी आणखी १,११,८१४ हेक्टर जमीन या कार्यक्रमाखाली आणली गेल्यामुळे गेल्या ३ वर्षांमध्ये एकूण ३,०८,४१६ हेक्टर क्षेत्र फळझाडांच्या लागवडीखाली आले आहे.

१५. जवाहर रोजगार योजना या केंद्रपुरस्कृत कार्यक्रमाखाली वर्षभरामध्ये १९९.२१ कोटी रुपये खर्चाने ८.३८ कोटी श्रमदिवस निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. इंदिरा आवास योजनेखाली अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि बंधमुक्त वेठबिगार कामगार यांच्यासाठी ९,५०० घरे बांधावयाची आहेत. अनुसूचित जाती-जमातींच्या लाभधारकांसाठीच्या ' दशलक्ष विहिरी ' कार्यक्रमाखाली ४,२५० नवीन विहिरी बांधल्या जातील अशी अपेक्षा आहे. खेड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर लहान जलसंधारण बांधकामे करण्यासाठीही जवाहर रोजगार योजनेखालील निधी वापरण्यात आला आहे.

१६. पाटबंधाऱ्यांच्या विकासाला गती मिळावी म्हणून १९९२-९३ मध्ये अधिक नियत रकमा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १९९३-९४ करिता १९९२-९३ पेक्षा ४० टक्के अधिक रक्कम उपलब्ध करून देण्याचे ठरवले आहे. दोन मोठ्या नवीन व अकरा मध्यम नवीन पाटबंधाऱ्यांचे काम हाती घेण्यात आले आहे. सध्या ३८ मोठ्या, ७७ मध्यम आणि ६०८ राज्यक्षेत्रांतर्गत लहान पाटबंधारे प्रकल्पांचे बांधकाम सुरू आहे. जून १९९२ पर्यंत एकूण २७.१५ लाख हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली असून तिच्यामध्ये जून १९९३ अखेरपर्यंत आणखी ७१,००० हेक्टर सिंचनक्षमतेची भर पडेल अशी अपेक्षा आहे.

१७. माझ्या शासनाने सहकारी क्षेत्रात आणखी १० सूत गिरण्या स्थापन करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे राज्यातील कापूस उत्पादकांना तर प्रोत्साहन मिळेलच, पण त्याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचेही संवर्धन होईल. जनता साडी-धोती योजना १९९२-९३ मध्येही सुरू होती आणि वर्षभरात या योजनेखाली १९.५० लाख साडी-धोती संचांचे वाटप करण्याचे अपेक्षित होते. या योजनेमुळे हातमाग विणकरांना रोजगार पुरवणे आणि लोकांना परवडणाऱ्या दरात कापड उपलब्ध करून देणे अशी दुहेरी उद्दिष्टे साधली जात आहेत.

१८. ५०० मेगावॅटचे पाचवे युनिट चंद्रपूर येथे ११ मार्च १९९२ रोजी कार्यान्वित करण्यात आले. देशातील राज्य-विद्युत-मंडळ क्षेत्रातील अशा प्रकारचे हे सर्वात मोठे युनिट आहे. ५०० मेगावॅटचेच सहावे युनिट चंद्रपूर येथे मार्च १९९३ अखेरपर्यंत कार्यान्वित करण्यात येईल. विजेच्या पारेषण व वितरण पद्धतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने २२५

मेगाव्होल्ट ॲम्पिअर क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे आणि ३३ किलोव्होल्ट तारमार्गाचे ७५० परिपथ किलोमीटर लांबीचे बांधकाम करण्याचे १९९२-९३ साठी असलेले उद्दिष्ट साध्य केले जाईल. आतापर्यंत राज्यातील सर्व गावांचे विद्युतीकरण झालेले असले तरी सुमारे ३०,००० वाड्यांमध्ये अद्याप वीज पोहोचावयाची आहे. यासाठी एक विशेष कार्यक्रम राबवून आगामी पाच वर्षांत अशा सर्व वाड्यांना वीज पुरवण्यात येईल.

१९. जुलै १९९१ मध्ये घोषित झालेल्या उदार औद्योगिक धोरणाचा जास्तीतजास्त लाभ घेण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कार्यवाही केली आहे. मला हे सांगण्यास आनंद होतो की, १९९२ मध्ये राज्यातील १,२२८ उद्योजकांनी औद्योगिक उद्योजक ज्ञापने सादर केली आहेत. याखेरीज २७३ कारखान्यांना भारत सरकारकडून इरादापत्रे मिळाली असून त्यामुळे राज्यात २,८९८ कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक होणार आहे.

शासनाने १० निवडक जिल्ह्यांमध्ये, तुतीची लागवड व रेशीम कोषांचे उत्पादन करण्याचा कार्यक्रम रोजगार हमी योजनेशी समन्वय साधून पथदर्शी तत्त्वावर हाती घेण्याचे ठरवले आहे. या कार्यक्रमानुसार प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येकी २० हेक्टरच्या दोन गटांमध्ये तुतीची लागवड करण्यात येईल.

२०. राज्यातील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या कामगिरीची वेळोवेळी पहाणी करून व आढावा घेऊन त्यांच्या कामात सुधारणा करण्याच्या दृष्टीने वित्तमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. वर्धनक्षम नसलेले तसेच तोट्यात चालणारे उपक्रम ज्या परिस्थितीत बंद करता येतील ती परिस्थिती व कार्यपद्धती ठरविणारी मार्गदर्शक तत्त्वेही निश्चित करण्यात आली आहेत.

२१. नवीन आर्थिक धोरणाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने राष्ट्रीय नूतनीकरण निधी स्थापन केला आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे जे कामगार विस्थापित होतील त्यांना या निधीचा लाभ होईल. या निधीचा उपयोग इतर गोष्टींबरोबरच अशा विस्थापित कामगारांना नवीन उद्योगधंद्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना पुन्हा रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी केला जाईल.

यावर्षीही औद्योगिक संबंध चांगले राहिले आणि संप व टाळेबंदी यामुळे उत्पादक व उत्पादनेतर उद्योगांतील डिसेंबर १९९२ मध्ये संपणाऱ्या ९ महिन्यांच्या कालावधीत वाया गेलेल्या श्रमदिवसांची संख्या त्यामागील वर्षाच्या ९ महिन्यांच्या आकडेवारीपेक्षा कमी म्हणजेच ३६.१२ लाख होती.

२२. माझे शासन आदिवासींच्या विकासाकडे नेहमीच विशेष लक्ष पुरवीत आले आहे. १९९२-९३ मध्ये राज्याच्या निवडक दुर्गम आदिवासी भागांत ५३७ नवीन

अंगणवाड्या, १७ पोषण आहार केंद्रे आणि ५७ नवीन आश्रमशाळा उघडण्यात आल्या आहेत आणि ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४२ प्राथमिक आरोग्य पथके आणि २७ फिरत्या आरोग्य पथकांना मान्यता देण्यात आली आहे. त्याबरोबरच आदिवासी भागातील विद्यमान शाळांची प्रवेशक्षमता आणखी ४८,००० जागांनी वाढवण्याचेही शासनाने ठरवले आहे. १९९३-९४ ची आदिवासी योजना २६५ कोटी रुपये खर्चाची असेल व तिच्यामध्ये लहान पाटबंधारे आणि डोंगराळ भागातील रस्ते यांवर खास भर देण्यात येईल. आदिवासी विकासासाठी राखून ठेवण्यात आलेली एकूण योजनांतर्गत खर्चाच्या ७ टक्के रक्कम आदिवासी विकास विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्यामुळे या विभागाला आदिवासी भागासाठी विकास योजना आखताना व त्यांची अंमलबजावणी करताना आदिवासींच्या प्रत्यक्ष गरजा आणि आकांक्षा लक्षात घेणे शक्य होईल. भारत सरकारने या निर्णयाची प्रशंसा केली असून इतर राज्यांनीही या निर्णयाचे अनुकरण करावे अशी शिफारस केली आहे.

२३. माझ्या शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्था विशेषत: आदिवासी भागामध्ये मजबूत करण्याचे ठरविले आहे. या भागांमध्ये नवीन स्वस्त धान्य दुकाने व गोदामे यांची तरतूद करण्यात आली आहे. याखेरीज गहू, तांदूळ, ज्वारी, खाद्यतेले, डाळी व आयोडिनयुक्त मीठ यांसारख्या अत्यावश्यक वस्तू अर्थसहाय्यित दराने देण्याचे आणि प्रत्येक कुटुंबाला या वस्तूंचा किमान आवश्यक पुरवठा होत आहे याची खात्री करून घेण्याचेही ठरवण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी ५३ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च येणार असून १४ जिल्ह्यांमधील ६८ एकात्मीकृत आदिवासी विकास प्रकल्प गटांतील आदिवासींना त्याचा लाभ मिळणार आहे.

२४. प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांसाठी, एक-शिक्षकी शाळा आणि आदिवासी क्षेत्रातील शाळांमध्ये सुरू असलेल्या पोषण आहार कार्यक्रमाचा लाभ सध्या २४ लाख विद्यार्थ्यांना मिळत आहे. या कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना प्राथम्य तत्त्वावर दूध व अंडी देण्याचे ठरवण्यात आले आहे.

२५. जनतेमध्ये पर्यावरणविषयक जाणीव निर्माण करण्यासाठी माझ्या शासनाने शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवरील पाठ्यपुस्तकांमध्ये पर्यावरणविषयक माहिती समाविष्ट करण्याचे ठरवले आहे. केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय नद्या कृती कार्यक्रमाखाली कृष्णा आणि गोदावरी नद्यांच्या मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झालेल्या भागांचे शुद्धीकरण करण्याचेही ठरवले आहे.

२६. विरळ लोकवस्ती असलेल्या दुर्गम आदिवासी क्षेत्रातील मुलांना प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी घरापासून दूर जावे लागू नये म्हणून शासनाने सध्या असलेली परिमाणे शिथिल करून ५४७ नवीन प्राथमिक शाळा सुरू करण्याचे ठरवले आहे. त्यांपैकी १५६ एक-शिक्षकी शाळा १०० ते २०० इतकी लोकसंख्या असलेल्या ठिकाणी तर ३९१ दोन-शिक्षकी शाळा २०० हून अधिक लोकसंख्या असलेल्या गावांत असतील.

खडू-फळा (ऑपरेशन ब्लॅक बोर्ड) योजनेखाली १९९२-९३ मध्ये १२,२३१ एक-शिक्षकी शाळांचे रूपांतर दोन-शिक्षकी शाळांत करण्यात आले आहे.

१५ ते ३५ वयोगटातील निरक्षर व्यक्तींसाठी १९९२-९३ मध्ये औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, लातूर, पुणे व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये संपूर्ण साक्षरता मोहीम हाती घेण्यात आली आहे. उस्मानाबाद व सांगली जिल्ह्यांमध्येही हा कार्यक्रम सुरू करण्यासाठी भारत सरकारची मंजुरी मिळाली आहे.

२७. १९९२-९३ मध्ये २७५ संस्थांना प्रत्येक पाठ्यक्रमासाठी प्रत्येक गटात २० विद्यार्थी याप्रमाणे ८२५ गटांत उच्च माध्यमिक पातळीवरील व्यवसाय पाठ्यक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरणानुसार दहावी इयत्ता उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी२५ टक्के विद्यार्थ्यांना आठव्या योजनेच्या अखेरपर्यंत व्यवसाय प्रशिक्षण द्यावयाच्या योजनेचा हा एक टप्पा आहे.

२८. शिक्षणामध्ये संगणकावर भर देण्याच्या राष्ट्रीय धोरणाचा भाग म्हणून राज्यामध्ये संगणक शिक्षणविषयक अभ्यासक्रम विकसित करणे, शिक्षकांना संगणकांचे प्रशिक्षण देणे आणि संगणक शिक्षणाचे साधन म्हणून तंत्रनिकेतनांचा विकास करणे ही कामे हाती घेण्यात येत आहेत. तीन संस्थांमध्ये पदविका पातळीवरील संगणक पाठ्यक्रम आणि सात संस्थांमध्ये पदविकोत्तर संगणक पाठ्यक्रम सुरू केले आहेत. द्विस्तरीय पाठ्यक्रम सुरू करण्याच्या आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने, पाठ्यक्रम तयार करताना तंत्रनिकेतनांना स्वातंत्र्य मिळावे म्हणून राज्यातील तेरा तंत्रनिकेतनांना स्वायत्तता प्रदान केली आहे.

२९. ग्रामीण विकासासाठी भूमि अभिलेख अद्ययावत ठेवणे पायाभूत महत्त्वाचे असल्याने शासनाने येत्या पाच वर्षांत प्रत्येक वर्षी ६ जिल्हे याप्रमाणे संपूर्ण राज्यातील भूमि अभिलेखांचे संगणकीकरण करण्याचे ठरविले आहे.

३०. जागतिक बँकेच्या सहाय्याने हाती घेतलेल्या वनीकरण प्रकल्पांतर्गत १९९२ मध्ये ७,९८५ हेक्टर जमिनीचे वनीकरण करण्यात आले आणि येत्या पावसाळ्यात या

प्रकल्पाखाली आणखी २०,००० हेक्टर जमिनीवर झाडे लावण्यात येतील. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी वनक्षेत्रात लहान तलाव बांधण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येईल. नेहमीच्या लागवड कार्यक्रमामुळे फळझाडांची टक्केवारी १५ टक्क्यांनी वाढेल. झुडपी जंगलांच्या सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून पर्यायी वनीकरणासाठी योग्य अशी ४५,००० हेक्टरहून अधिक जमीन निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक विकास प्रकल्पांना वन संरक्षण अधिनियमाखाली मान्यता मिळवण्यासाठी आवश्यक असलेली पर्यायी वनीकरणाची अट पूर्ण करणे आता सोपे झाले आहे.

३१. यावर्षी राज्यामध्ये ' स्मृति उद्यान ' नावाची नवीन योजना सुरू करण्यात आली असून या योजनेखाली जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी किंवा जवळपास योग्य उद्याने तयार करून तेथे लोकांच्या निकटच्या नातेवाईकांच्या स्मृतीप्रीत्यर्थ झाडे लावून त्यांची निगराणी करावयाची आहे. ९ जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी ही योजना सुरू झाली असून मार्च १९९३ पर्यंत आणखी ३ उद्यानांच्या कामाला सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे.

३२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दीनिमित्त राज्य शासनाने सुरू केलेल्या कार्यक्रमांचा भाग म्हणून १,२०० दलित वस्त्यांच्या सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे आणि त्यासाठी केंद्र शासनाचे सहाय्यदेखील मागितले आहे. राष्ट्रीय पातळीवरील महिला आयोगाच्या धर्तीवर राज्य पातळीवरील महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. हा आयोग महिलांच्या कल्याणाकरिता आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजनांची शिफारस शासनाला करील.

३३. जपानच्या ओव्हरसीज इकॉनॉमिक कोऑपरेशन निधीमधून मिळणाऱ्या सहाय्याद्वारे अजिंठा-वेरूळ परिसरासाठी सर्वांगीण क्षेत्र विकास योजना सुरू करण्यात आली आहे. चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणासाठी विशेष विकास योजना मंजूर करण्यात आली असून या योजनेखाली विहारस्थळे आणि वन्यजीवन पर्यटन यांसंबंधीच्या सुविधा पुरविण्यात येतील. कोकण भागातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठीही एक विशेष योजना आखण्यात आली आहे; तसेच महाराष्ट्राचा संपन्न वारसा सांगणाऱ्या किल्ल्यांची ओळख पर्यटकांना व्हावी यासाठी २७ किल्ल्यांच्या पायाभूत सुविधांत सुधारणा करण्यात येत आहे.

३४. माझ्या शासनाने सांस्कृतिक क्षेत्रातील विख्यात कलाकारांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार देण्याच्या योजनेत सुधारणा केली असून या योजनेखाली दरवर्षी मराठी रंगभूमी,

शास्त्रीय संगीत, वाद्य संगीत, मराठी चित्रपट, तमाशा, कीर्तन, शाहिरीकला/लोककला आणि नृत्य या प्रत्येक क्षेत्रातील एका कलाकाराला प्रत्येकी २५,००० रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

३५. राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या विशेष विकास कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत पंढरपूरसाठी ८ कोटी रुपये तर आळंदीसाठी ४.२३ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत आणि या दोन्ही ठिकाणची कामे येत्या दोन वर्षांत पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. देहू, शेगाव आणि तुळजापूर येथील कामे प्रगतिपथावर आहेत आणि रामटेक व शिर्डी येथील कामे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

३६. 'एडस्' ही सद्यकालातील आरोग्यविषयक गंभीर समस्या असून ती युद्धपातळीवर सोडवणे आवश्यक आहे. या समस्येवर प्रकर्षाने लक्ष केंद्रित करण्याकरिता आरोग्य संचालनालयामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच राज्यामध्ये 'एडस्' नियंत्रण मंडळही स्थापन करण्यात आले आहे. भारत सरकारने 'एडस्' नियंत्रण कार्यक्रमास १०० टक्के केंद्रपुरस्कृत योजना म्हणून घोषित केले असून या वर्षासाठी त्याकरिता वित्तीय सहाय्यही देण्यात आले आहे.

३७. ग्राहक संरक्षण अधिनियमाखालील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी, माझ्या शासनाने ग्राहक संरक्षण हा स्वतंत्र विभाग निर्माण केला असून मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली निधी उभारण्याचेही ठरवले आहे.

३८. १,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली सुमारे ८९ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी जोडली गेली आहेत. उरलेली गावेही आठव्या योजनेच्या काळात अशा प्रकारे जोडण्यात येतील. १९९१–९२ मध्ये ३,४२१ किलोमीटर लांबीच्या डांबरी रस्त्यांची भर पडल्यामुळे राज्यामध्ये आता एकूण ४७,२६७ किलोमीटर लांबीचे डांबरी रस्ते तयार झाले आहेत. मुंबई महानगर क्षेत्रातील गर्दीच्या ठिकाणी होणारी रहदारीची कोंडी कमी करण्यासाठी ५ उड्डाणपूल बांधण्यास मंजुरी दिली असून त्यांपैकी ४ उड्डाणपुलांचे बांधकाम सुरू झाले आहे. नागपूर शहरातील पाचपावली येथील पुलाचे बांधकाम यावर्षी पूर्ण झाले आहे.

३९. मुंबई महानगरपालिकेने दादर येथील चैत्यभूमीच्या सुशोभीकरणाची योजना आखली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'राजगृह' हे निवासस्थान राज्य स्मारक म्हणून घोषित करण्याचेही माझ्या शासनाच्या विचाराधीन आहे.

४०. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) मध्ये योजल्याप्रमाणे वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यास माझे शासन बांधील आहे. कोकण विभागासाठीही स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करता यावे यासाठी वरील अनुच्छेदात आवश्यक ती सुधारणा करण्याविषयी माझ्या शासनाने भारत सरकारला विनंती केली आहे. राज्य शासन या मागणीचा भारत सरकारकडे सर्वोच्च पातळीवर सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

४१. महाराष्ट्र–कर्नाटक सीमा तंटा समाधानकारक रीतीने मिटवण्यासाठी सीमावर्ती भागातील जनमताचा कौल घेण्याच्या विनंतीचा राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पुनरुच्चार केला आहे. १७ जुलै १९९२ रोजी मुख्यमंत्री व अन्य नेत्यांनी पंतप्रधानांची भेट घेऊन हा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याची निकड त्यांच्या निदर्शनास आणून दिली.

४२. सन्माननीय सदस्य, या अधिवेशनात पूरक मागण्या, अर्थसंकल्प, लेखानुदान, काही अध्यादेशांचे अधिनियमांत रूपांतर करणारी विधेयके, प्रलंबित व तातडीच्या स्वरूपाची नवीन विधेयके तसेच अनेक तातडीची शासकीय आणि अशासकीय कामे यांच्यावर आपल्याला विचारविनिमय करावयाचा आहे.

या अधिवेशनातील आपल्या विचारविमर्शात मी आपणास सुयश चिंतितो.

**॥ जय हिंद, जय महाराष्ट्र ॥**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई